## प्रकरण पाचवे

## स मा रो प

## प्रकरण पाचवे

## स मा रो प

भाऊ पाध्ये यांच्या "एक सुन्हेरा ख्वाब", "मुरगी", "थालीपीठ", या कथासंग्रहांच्या आधारे त्यांच्याकथालेखनाचा विचार या लघुप्रबंधात केलेला आहे.

१९६० नंतरच्या कथेने जे नवे रूप धारण केले, या नव्या रूपाच्या जडणघडणीत भाऊ पाध्ये यांचा महत्त्वाचा सहभाग आहे.

भाऊ पाध्ये यांच्या कथातून मुंबईतील समाज जीवनाचे विविध स्तर त्यांच्या मूलभूत जन-जीवन वैशिष्ठयांसह कलात्मकतेच्या पातळीवर आविष्कृत झालेले आहेत. चित्रण क्षेत्राची विविधता त्यांच्या कथेत प्रत्ययाला येते. मुंबईतील अनेक दुर्लक्षित समाजजीवनाचे गुंते त्यांच्या कथेचे विषय होतात. मानवी जीवनानुभवाची जटिल स्वरूपाची सखोल जाणीव त्यांच्या कथेतून प्रत्ययाला येते.

पाध्ये यांची कथा पारंपारिक नैतिकमूल्य बाजूस सारून नव्या भूमिकेतून सम-कालीन जीवन वास्तवाचा वेध घेते. त्यांची कथा स्त्री-पुरुष संबंधाकडेही वेगळया, नव्या, निर्मम दृष्टीने पहाते. त्यांच्या शैलीचे हे अनोखे सामर्थ्य आहे, या प्रथमदर्शनी जाणवणा-या वैशिष्टयांचा शोध बारकाईने घेण्याचा प्रयत्न सदर लघुप्रबंधात केलेला आहे.

पाध्ये यांच्या कथालेखनातील वैशिष्टयांचा शोध घेण्यासाठी मराठी कथेच्या रूपाचा विचार करून तिच्या विकासाचे टप्पे पहाणे गरजेचे असल्या-मुळे पहिल्या प्रकरणामध्ये मराठी लघुकथेच्या स्वरूपाचा सविस्तर विचार करून विकासाचा आढावा घेतलेला आहे. कथा ही "एकात्म परिणाम" साधत असते. कथेत मानवी मनाचे, कृतीचे, घटनांचे चित्रण असते.

कथेची समष्टी कथार्थ, कथानक, पात्र, वातावरण निवेदन पध्दती या घटकांगांनी साकारते. या घटकांगांचे स्वरूप विवेचन सविस्तर असे केलेले आहे.

मराठी कथा वाड्.मयाचा विकास पाहिला असता मराठी कथेने विविध रूपे धारण केलेली दिसतात.

मराठी कथेचे आद्य प्रवर्तक हरिभाऊ आपटे यांनी लिहिलेल्या कथांतून त्याची विविधता असल्याने दिसून येते. "खाशी तोडी", "डिस्पेशिया" आदि कथा बांदेसूद आकाराच्या असलेल्या दिसतात. तर काही व्यक्तिचित्रे आहेत. हरिभाऊ आपट्यांनी जाणीवपूर्वक लिहिलेल्या बोध कथांनी मराठी कथेला निखळ बोधवादाबरोबरच ब-याच प्रमाणात वास्तवाकडे नेण्याचा प्रयत्न केला.

हरिभाऊ आपटे यांच्यानंतरचे महत्त्वाचे कथाकार दिवाकर कृष्ण होत. दिवाकर कृष्ण यांच्या कथेने कथा प्रौढ करण्याचे काम केले. मनाचे चित्रण करणे हा कथेचा विषय असू शकतो ही महत्त्वाची जाणीव त्यांनी कथा लिहून प्रकट केली. पण त्यांचा प्रभाव समकालीन कथाकारांवर पडू शकला नाही ही दुर्दैवाची बाब होय.

कृत्रिम तंत्रवादाच्याआहारी जाऊन आभासात्मक कथा लिहिण्याचे काम फडके यांनी केले. त्यांनी तंत्र, भाषेची घडण अशा काही ब-या गोष्टीही मराठी कथेत आणल्या हे मान्य करावयास हवे. त्यांनी भाषेतील बोजडपणा व पाल्हाळ काढून टाकला. कथा विषयात विविधता आणली. हे खरे असले तरी हरिभाऊंनी सुरु केलेल्या वास्तववादी कथापरंपरेची फडक्यांनी परागती केली, तर वि.स. खांडेकरांच्या कथेने आदर्शांच्या पाठीमागे धावून फसवे स्वप्नरंजन करण्यास मराठी कथेस भाग पाडले.

फडक्यांच्या स्वप्नरंजनपर तंत्रनिष्ट कथेची प्रतिक्रिया म्हणूनच य.गो. जोशी यांची कथा निर्माण झाल्याचे दिसते. जोश्यांनी कथा विषयात व कथेच्या बाह्यरूपात बदल केला. पण नंतर त्यांची कथा बेगडी व भावनाविवश होत गेली.

फडके - खांडेकरांच्या लेखनामुळे निर्माण झालेली कोंडी वामनराव चोरघडे यांनी काही अंशी फोडली. पण ते फार मोठया आवाक्याच्या कथा लिहू शकले नाहीत. वामनराव चोरघड्यांच्या नंतर मराठी लघुकथेचे स्वरूप पार पालटून गेले. नवी कथा जोमाने पुढे आली. या नव्या लघु-कथेने संपूर्ण कथावाङ्मयाची फेर मांडणी केली. नवकथेच्या लेखकांनी कलेच्या क्षेत्रातील संकेत झुगारून दिले. कथेला जीनाभीमुख बनवले. ही नवकथा प्रामुख्याने गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु.भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर या चार कथाकारांनी समृध्द केली.

पु.भा. भावे यांची कथा थोडीफार पूर्व परंपरेतूनच आलेली आहे. पण त्यांनी जीवन-चित्रणात बेडरपणा, काव्यात्मकता, ओजस्वीपणा, व विलक्षण वेग आणला. पु.भा. भावे यांच्या कथात आशय व तन्मयता दिसली तरी त्यांच्या कथांनी प्रयोग करण्याची आस कधी बाळगली नाही. अरविंद गोखले यांनी वेगळया जाणीवेने कथा लिहिल्या. गोखले मनो-विश्लेषणात्मक कथा लिहिण्यात यशस्वी झाले असे मानण्यात येते पण त्यांच्या समग्रकथा पाहिल्यानंतर त्यांना व्यक्ती मनाचा तळ सापडलेला नाही असे दिसते. पूर्वपरंपरेपेक्षा कथेला आशयाच्या, अभिव्यक्तिच्या अंगाने समृध्द करण्याचे काम व्यंकटेश माडगुळकर यांनी केले. ग्रामीण जीवना-चा अनुभव आणि दैवदत्त कलात्मक जाणीव यामुळे त्यांच्या कथा या खऱ्या माणसाच्या जिवंत कथा ठरल्या. माडगूळकरांनी जुने तंत्र, संकेत बाजूस सारून निवेदनाच्या विविध शैलीचा प्रत्यय आणून दिला.

मराठी लघुकथेला खऱ्या अर्थाने आधुनिक केले ते गंगाधर गाडगीळ यांनी. गाडगीळांनी माणसाचा ओढाळपणा, लैंगिकविकृती, स्वार्थी, अपमतलबीपणाचे चित्रण आपल्या कथांतून चांगल्या पध्दतीने केलेले आहे. गाडगीळांनी कथेच्या संदर्भातक केलेले प्रयोग जुन्या पारंपारिकतेला हादरे देणारे आहेत. गाडगीळांनी मराठी लघुकथेला नवता तर दिलीच पण त्याबरोबर भक्कम सामाजिक वास्तवाचे भान दिले.
नवकथेने आपल्या कालखंडात मराठी कथेचा परिघ मोठा केला. पण या सर्वच कथाकारांनी पारंपारिक नैतिक भूमिकेतून लेखन केलेले दिसते. नव्या भूमिकेतून लेखन करण्याचा प्रयत्न १९९० नंतर झाला. हया भूमिकेला भालचंद्र नेमाडे "नवनैतिकतावादी" भूमिका असे म्हणतात.

ही भूमिका लेखनातून आविष्कृत करण्याचा प्रयत्न मराठीत फारच कमी लेखकांनी केलेला आहे. कथेच्या बाबतीत भाऊ पाध्ये या कथाकारापर्यंत हया भूमिकेतून लेखन करणारे लेखक अपवादानेच सापडतात.

खऱ्या अर्थाने पाध्ये हे नवनैतिकतावादी भूमिका असणारे समर्थ कथाकार आहेत. ज्या कालावधीत ही संज्ञा अस्तित्वात आलेली नव्हती त्या काळापासून पाध्ये लेखन करतात. पण त्यांच्या लेखनात या भूमिकेचे निश्चित केलेले पैलू सर्वार्थाने आढळताना दिसतात. त्यामुळे त्यांच्या कथेची वैशिष्टये ही वेगळी असल्याचे दिसून येते. कथा नवकथेच्यापुढे नेण्याचे काम पाध्यांनी केल्याचे जाणवते.

दुसऱ्या प्रकरणामध्ये भाऊ पाध्ये यांच्या कथांच्या आशयसूत्रांचा विचार केलेला आहे. भाऊपाध्ये हे लेखक म्हणून स्वतंत्र जाणीव आणि भूमिका असणारे लेखक आहेत. त्यांचे लेखन गंभीरताप्राप्त वैचारिक बैठकीवर आधारलेले आहे. त्यांचा जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टिकोण स्वतंत्र आहे. मुंबई महानगरीत घडणारी त्यांची कथा, जीवनाची व्यापक क्षेत्रे आशयासाठी निवडते. त्यामुळे त्यांच्या कथा इतर कथाकारांच्यापेक्षा वेगळ्या वाटतात.

पाध्ये जीवनाकडे अत्यंत आत्मीयतेने पहातात. त्यांच्या विशाल निरीक्षण शक्तीचा प्रत्यय त्यांच्या कथांमधून येतो. पाध्ये यांच्या कथालेखनाची सकृतदर्शनी जाणवणारी वैशिष्टये अधिक सखोलतेने शोधण्यासाठी त्यांच्या कथांच्या आशयसूत्रांचा विचार केलेला आहे.

पाध्ये यांच्या बहुतेक कथांतून स्त्री-पुरूष संबंधाचे चित्रण येते. ते आपल्या कथांतून स्त्री-पुरूष संबंधातील वेगवेगळे पैलू नैसर्गिक सहजतेने चित्रित करतात. स्त्री-पुरूष संबंध नीटपणे समजावून घेऊन तो निसर्गधर्म स्वच्छ आणि निर्लेप पध्दतीने कथेत आणण्याचा प्रयत्न पाध्यांनी केलेला आहे.

साधारणपणे हिंदू संस्कृतीत स्त्रीला दुय्यम दर्जाचे स्थान आहे. वस्तू हेच तिचे मूल्य मानलेले दिसते. या रूढ नैतिक कल्पनेनुसारच योनी-शुचितेची कल्पना केंद्रभागी मानण्यात आलेली आहे. यातूनच स्त्रीवर विविध स्वरूपाचे अन्याय झालेले दिसतात. या अन्यायाचे वास्तव चित्रण पाध्ये आपल्या कथांतून करतात. पण त्यातही स्त्री म्हणजे अन्याय सहन करणारी, सोशीक असा भावनात्मक आक्रोश नाही. "आहे हे असे आहे" इतक्या सहजपणे ते या विश्वाचे दर्शन घडवतात.

विवाहित स्त्री म्हणून जगत असताना स्त्रीला स्वत:चे असे वेगळे अस्तित्व उरतेच असे नाही. ब-याच वेळा तिच्या गमावून बसलेले व्यक्तित्व शोधण्याचा, प्रामाणिकपणे जगण्याचा प्रयत्न चाललेला असतो. अशा स्त्री जीवनातील ताण-तणाव पाध्ये "संकेत मिलनाचा", "ठेच, थोडी सी जो पीली" या कथांतून चित्रित करतात.

विशिष्ट मानसिक घडण लाभलेले अथवा विशिष्ट मानसिक घडण तयार झालेले पुरूष स्त्रीवर वेगवेगळया स्वरूपाने अन्याय करत असतात.

स्त्रीचा छळ ही त्यांच्यात निर्माण झालेली एक विकृती असते. अशा स्त्रिया जे दु:ख भोगतात, त्यांच्या वाटयाला जे जीवन येते याचे चित्र आपल्याला "पायातील बूट", "बायका खाणारी माणसं", "पोल्ट्री-फार्मिंग" 'अनुभव' या कथांतून वास्तवपणे उभे केलेले दिसते.

पाध्यांनी आपल्या काही कथांतून उच्चवर्गीय विवाहितांचे जीवन चित्रित केलेले दिसते. या वर्गाच्या समस्या सर्वस्वी भिन्न असतात. या स्त्रियांचे जीवन "वसुंधरा", "थालीपीठ", "कुटुंब", "थिएटर" या कथांतून यथार्थपणे मांडलेले दिसते. या स्त्रिया मुक्त जगणाऱ्या, स्वत:च्या इच्छा जपणाऱ्या अशा आहेत. तर काही फसलेल्या ढोंगी अशाही आहेत.

काही विवाहितांच्या पदरी पडलेला पती हा त्यांच्या योग्यतेचा किंवा मनासारखा नसल्याने स्त्रियांच्या पदरी जे अपेक्षाभंगाचे दु:ख पडते, तडजोडीवर त्यांचे संसार कसे चाललेले असतात. नामर्दपती मुळे होणारी शारीरिक तडफड, मानसिक कोंडमारा, समाजातील हेटाळणी यातून शोधावी लागलेली नवीन वाट यामुळे त्या स्त्रियांच्या वाटयाला काय येते ? याचे वास्तव चित्र "नवरा", "अक्करमाशा", "गुदाम", "पडदा" या कथांमधून पाध्ये यथार्थपणे रंगवतात.

पाध्ये स्त्री-पुरुष संबंधाचे वर्णन करत असताना असाहयपणे एखादया मनोविकृत पुरुषाच्या तावडीत सापडलेल्या स्त्रियांचेही चित्रण पाध्ये तपशीलासह समर्थपणे करतात. याठिकाणी स्त्रीचे मूल्य "वस्तू" एवढेच उरलेले दिसते. "मुरगी", "फाईव्ह गाईज" या कथांतून पाध्ये यांनी अशा विश्वाचे दर्शन घडविलेले आहे.

मुंबईतील वेश्या जीवन हा विषय पाध्ये जितक्या वेगळ्या तऱ्हेने हाताळतात तितका वेगळेपणा अन्य मराठी कथाकारांच्या कथांत नाही.

वेश्या जीवन हे मुद्दाम कळकळा म्हणून अथवा अन्याय निर्मूलन करण्याच्या हेतूने आलेले नाही. महानगरीत या जीवनाचे स्वरूप असे आहे इतक्या सहज वास्तवपणे पाध्ये "चलोना वाली", "तेरी भी चूप मेरी भी चूप" या कथांमधून हे जीवनदर्शन घडवतात.

स्त्री-पुरुष संबंधाबरोबरच पाध्ये यांच्या कथातून मुंबईच्या जीवनाचे विविध स्तर येतात. त्या स्तरातील बारकावे पाध्यांच्या कथेत खाचून भरलेले आढळतात. "पासवर्ड""थालीपीठ" या कथा या प्रकारच्या आहेत. राजकारणाकडे पाध्ये विविधांगांनी पहातात. "स्व. देशभक्त काका" सारखी कथा त्यांची राजकीय विश्लेषण पध्दती दाखवते तर "देश पुढे गेला" कथेत त्यांची शैली उपहासगर्भ कशी बनते याचे प्रत्यंतर येते.

कलावंताच्या जीवनाचा वेगळेपणा, त्यांच्या मानसिकता याचे दर्शन ते "मुलाम", "बेसूरा" या कथेत घडवतात.
पाध्यांच्या कथांच्या आशयसूत्रातून आपल्याला असे आढळते की पाध्ये आशय-द्रव्य वास्तवातून निवडतात. त्यांचे हे वास्तवभान त्यांच्या कथेत वैविध्य आणते. पाध्ये जीवनाचा वेध सखोलतेने घेतात. जीवनाकडे आत्मीयतेने पहातात. विविध जीवनक्षेत्रातील तपशील त्यांना कथा लेखनात महत्त्वाचे वाटतात.
त्यांची कथा एकसारखी अथवा साचेबध्द नाही. त्यांची कोणतीच कथा दुसऱ्या कथेसारखी नाही. प्रत्येक कथा स्वतंत्र आणि त्यांच्या लेखन-शैलीचा वेगळा पैलू दाखवणारी आहे.

तिसऱ्या प्रकरणात पाध्यांच्या कथेतील व्यक्तिरेखांचा विचार केलेला आहे. पाध्ये मुंबईच्या जीवनातील विविध थरातील, वर्गातील जीवनविश्वे

जशी आशयासाठी निवडतात तसेच व्यक्तिचित्रणासाठी ही सर्व-
थरातील, वर्गातील व्यक्तिरेखा निवडतात.
या व्यक्तिरेखा वास्तवपूर्ण व जीवन्त अशा रेखाटण्यात पाध्ये यशस्वी होतात. याला कारण मानवी जीवनाबाबत त्यांना कमालीची आस्था आहे. त्यामुळे मानवी स्वभाव ते आस्थापूर्वक समजून घेतात व चित्रित करतात. त्यांच्या व्यक्तिरेखा विलक्षण परिणामकारक होतात.

याला कारण प्रसंग, घटना व तपशील यांचा पाध्ये व्यक्तिचित्रणासाठी समर्पक उपयोग करून घेतात. कधी फक्त प्रसंगातून तर कधी फक्त तपशीलातून ते प्रत्ययकारी व्यक्तिरेखा चित्रित करतात. पाध्यांच्या कथेतील आशय आणि व्यक्तिरेखा ह्या वेगवेगळया काढता येत नाहीत. त्यामुळे त्यांच्या कथांचा अभ्यास व्यक्तिरेखा अभ्यासाशिवाय पूर्ण होत नाही.

पाध्ये आपल्या कथांतून "वसुंधरा", "अनुसयाबाई" या सारख्या मुक्तस्वकल्पनेने जगणाऱ्या स्त्रियांच्या समर्थ व्यक्तिरेखा जशा उभ्या करतात तशाच दुर्दैवाच्या कचाटयात सापडलेल्या "सुनंदा", माई टुकळ, भामा, अनु, येसू यांच्या हतबल पण प्रांजल अशा व्यक्तिरेखा त्यांच्या कथेत येतात.

अन्याची आई, काकू यासारख्या स्त्रिया नपुसक नवरा सांभाळत आपल्या भावनांचा कोंडमारा होऊ न देता नैसर्गिक मार्ग शोधताना पाध्ये दाखवतात. तर छळणाऱ्या मालकिणीच्या तावडीत सापडलेली असाहय अनु पाध्यांची लेखनी वाचकांसमोर उभी करते.

कुटुंब कथेचा निवेदक-मी, मुक्त लैंगिक जीवनाचा पुरस्कार करणारा

रिसबुड, विकृतीच्या आहारी गेलेला केरु गावत्या, भाउखाऊ आबा टुकरुळ, गजा मारुळकर सारखा कलावन्त, बेसूरातील भास्कर तिळवेसारखा स्वच्छ मनाचा पुरुष अशा कितीतरी दमदार पुरुष व्यक्तिरेखा निर्माण केलेल्या आहेत.

पाध्यांनी रंगवलेल्या सर्वच व्यक्तिरेखा वास्तवातून उचललेल्या आणि वास्तवाशी अतुट संबंध दाखवणाऱ्या अशा आहेत. त्यामुळे ह्या व्यक्तिरेखा जिवंत हाडामासाच्या वाटतात. अशा वैशिष्टयपूर्ण व्यक्तिरेखा निर्माण करणारा कथाकार मराठीत अपवादात्मकच म्हणावा लागेल.

प्रकरण चारमध्ये पाध्यांच्या क लेखनाची वैशिष्टये शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

स्वत:च्या वाङ्मयीन भूमिकेशी प्रामाणिक राहून लेखन करणाऱ्या लेखकांचा वर्ग अत्यल्प संख्येत मराठी साहित्य दिसतो. कथे बाबतीत विचार केला तर भाऊ पाध्यांनी भूमिकानिष्ठ लेखन केलेले दिसते. पाध्यांच्या कथा संख्यात्मक दृष्टया विपुल नाहीत पण गुणात्मक दृष्टया अधिक संपन्न व कलात्मक आहेत.

पाध्ये हे व्यापक सहानुभावअणारे मानवतावादी लेखक आहेत. याचा प्रत्यय त्यांच्या कथांतून येतो. जगण्यातील अंत:प्रेरणा, सच्चेपणा, स्वातंत्र्य यांना पाध्यांच्या कथेत महत्त्वाचे स्थान आहे. जगण्यातील खोटेपणा, धर्माबाबतच्या एककल्ली कल्पना, किंवा रुढ नैतिकतेमुळे जीवनातील नैसर्गिकता गमावणे त्यामुळे अशा प्रवृत्तीतील कृत्रिमपणा ते आपल्या कथातून दाखवतात.
लैंगिकतेकडे पहाण्याचा पाध्यांचा दृष्टिकोण स्वतंत्र आहे. लैंगिकतेकडे पाध्ये एक नैसर्गिक व्यवहार म्हणून पहातात. त्यांच्या कथांतून येणारे

लैंगिक चित्राण नैसर्गिक व निर्लेप असे असते. कमालीचा तटस्थपणा स्वीकारून निसर्गधर्म म्हणून पाध्ये लैंगिकतेचा विचार करतात. येथे त्यांना रूढ नैतिकतेचा अडसर वाटत नाही.

त्यांची कथा एकच एका जीवनक्षेत्रात रममाण होत नाही. वेग-वेगळी जीवनक्षेत्रे ते कथेसाठी निवडतात. कामगार, राजकारणी, गुंड, कलावन्त, कारकून, हया विषयांबरोबरच पत्रकार, कारखानदार, चाळकरी, नाटक मंडळी, गायक, चलनवाद हे ही त्यांच्या कथेचे विषय होतात.

पाध्यांच्या सर्वच कथांतून त्यांची जीवनदृष्टी वेगळी असल्याचे जाणवते. ते कोणत्याही घटनेकडे स्वच्छ व निर्मळ दृष्टीने पहातात. त्यामुळे त्यांच्यातील लेखक वर्णनात पक्षपाती होत नाही तर तो फक्त वर्णनकारच असतो.
पाध्ये पक्ष घेऊन कथा लिहित नाहीत तसेच कोठेही अभिप्राय देत नाहीत. वर्णनात लेखकाच्या मतालाही डोकावू देत नाहीत. घटना, प्रसंगावर शेरेबाजी न करता अस्सल वास्तव स्वरूपात ते वाचकासमोर ठेवतात. त्यामुळे त्यांच्या कथांची कलात्मकता अधिक वाढते.
पाध्ये घटनांच्याकडे अलिप्तपणे पाहू शकतात.

पाध्यांच्या कथातील भाषा ही साधी, सरळ आणि मनाला भिडणारी अशी असते. त्यांना कथेसाठी भाषा कमवावी, घडवावी किंवा निवडावी लागत नाही. आशयद्रव्याबरोबरच त्यांची भाषा ही अवतरते आणि कलाकृतीला सजग बनवते. त्यांची भाषा ही अनुत्कट स्वरूपाची आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनातील वास्तवता अधिक गडद होते. भावविवश, उत्कटशैलीचा वापर ते कथेसाठी करत नाहीत.

अनलंकृतता हे त्यांच्या भाषेचे दुसरे वैशिष्ठय आहे. प्रसंगाला योग्य अशी साधी, सरळ आणि मनाला भिडणारी भाषा ते निवेदनसाठी वापरतात. त्यामुळे निवेदन नैसर्गिक होते. चित्रामयता हे त्यांच्या भाषेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. पाध्ये बोलीचा वापर कथेत अत्यंत परिणामकारक पध्दतीने करतात. बोलीच्या वापरामुळे वर्ण्य विषयाला अधिक वास्तवरूप प्राप्त होते. पाध्ये यांना भाषेवर प्रयोग करण्याची गरज भासत नाही. ते सहज नैसर्गिक भाषा वापरतात. त्यामुळे त्यांच्या भाषेला ही कलात्मक मूल्य प्राप्त होते.

पाध्यांच्या कथालेखनाचा या समग्रभूमिकेतून विचार केल्यानंतर आपल्याला असे आढळते की पाध्यांची कथा मराठी कथेच्या परंपरेत वेगळी आणि वाङ्मय प्रवाह संपन्न करणारी कथा आहे.

पाध्यांच्या आधीच्या कथाकारांच्या कथेत येणारा साच्चेबंदपणा आपल्याला त्यांच्या कथेत सापडत नाही. त्यांची प्रत्येक कथा स्वतंत्र व त्यांच्या लेखनाचा वेगळा पैलू दाखवणारी आहे.

पाध्यांची कथा आशयद्रव्य वास्तवातून निवडते. जीवनाची विविध क्षेत्रे त्यांच्या कथेचे विषय होतात. एवढे वैविध्य पाध्यांच्या आधीच्या कथाकारांच्या कथेत क्वचितच सापडते.

पाध्ये हे व्यापक सहानुभाव बाळगणारे मानवतावादी लेखक आहेत. त्यांच्या लेखक म्हणून असणाऱ्या भूमिकेशी प्रामाणिक राहून ते लेखन करतात. सच्चेपणा, स्वातंत्र्य, अंत:प्रेरणा आणि जगण्यातील नैसर्गिकपणा यांना ते महत्त्व देतात. याची साक्ष त्यांची कथा देते.
असे भूमिकानिष्ट कथालेखन मराठी कथेच्या इतिहासात कोणीही केलेले नाही असे दिसते.

पाध्यांची लैंगिकतेकडे पहाण्याची दृष्टी स्वतंत्र आहे. नैसर्गिक व्यवहार म्हणून ते लैंगिकतेचा ते विचार करतात. लैंगिक व्यवहाराचे वर्णन निर्मळ व निर्ममपणे करतात. यात त्यांना रुढ नैतिकतेचा अडसर वाटत नाही. वाटल्यास रुढ नैतिकता बाजूस सारतात. अन्य मराठी कथाकार रुढ नैतिकतेची पाठराखण करत कथालेखन करताना दिसतात.

माणसाविषयीची असणारी पाध्यांची आत्मीयता त्यांच्या कथेला वेगळेच परिमाण प्राप्त करुन देते. त्यामुळे ती अधिक कलात्मक होते. पाध्यांची सहज, साधी भाषा अनुभवाशी एकरुप होऊन येते. हे ही मराठी कथेत दुर्मिळ असल्याचे जाणवते.

त्यामुळे पाध्यांची कथा नवकथेनंतर मराठी कथेला अधिक गतिमान करते. त्यांच्या कथालेखनाने मराठी कथा अधिक संपन्न झालेली आहे हे असे म्हणता येईल.

.......

७) पाध्ये भाऊ : थालीपीठ,
डिंपल पब्लिकेशन, मुंबई,
आवृत्ती - पहिली, १९८४.

८) बेट्स : Selected Modern short stories
London,
Penguin book, 1945

९) शेवडे इंदुमती : मराठी कथा: उद्गम आणि विकास,
सोमय्या पब्लिकेशन प्रा.लि. मुंबई,
१९७३.

१०) हातकणंगलेकर म.द. : मराठी कथा रूप आणि परिसर,
सुपर्ण प्रकाशन, पुणे,
आवृत्ती - पहिली, १९८६.

(ब)

<u>नियतकालिके</u>

१) "गुलमोहर" : गुलमोहर दिवाळी अंक, पुणे,
१९८९.

२) साहित्यविमर्ष : साहित्यसंघ, मुंबई १९८७.

३) "सकाळ" : रविवार सकाळ, पुणे आवृत्ती,
९ जानेवारी १९८३.

....